मूल्य : ५ रुपये


स्वामी स्वरूपानंद सह. पतसंस्था, रत्नागिरी यांचे मुखपत्र

# स्वरूप सहकार

मे २०२६

## काळ्या पैशाला अजिबात थारा न देणारी

# स्वामी स्वरूपानंद पतसंस्था



# षष्ट्यब्दीपूर्तीचा तत्त्वनिष्ठ, प्रेरक प्रवास!

ज्यांच्या सक्षम नेतृत्वाखाली स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने धवल यश प्राप्त केले, त्यात सातत्य राखले आणि नवनवी शिखरे पादाक्रांत केली, ते संस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक मनोहर पटवर्धन यांच्या वयाने हीरकमहोत्सवी टप्पा ओलांडला आहे. 27 मे 1966 रोजी रत्नागिरीत जन्मलेल्या पटवर्धन यांनी सहकार, बँकिंग, राजकारण, वाचक चळवळ अशा विविध सामाजिक क्षेत्रांमध्ये आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. ॲड. दीपक पटवर्धन म्हणजे गुणांची खाण असलेले व्यक्तिमत्त्व आहे आणि ते ज्या ज्या क्षेत्रात गेले, त्या प्रत्येक ठिकाणी त्यांनी आपल्या या गुणांमुळे अतुलनीय, आदर्श कार्य केले. षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील निवडक साठ गुणांची ही प्रभावळ...! त्यांच्या आणि स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या यशाचे गमक यातच दडलेले आहे...!

(विशेष लेख... पान क्रमांक 11 वर)



## संपादकीय

# आव्हानात्मक काळात अर्थकारणाची दिशा ठरवताना...


नवे आर्थिक वर्ष, नवी उद्दिष्टे, नवे उपक्रम यांच्या कार्यान्वयनासाठी नियोजन करत असताना आंबा व्यावसायिक, मच्छी व्यावसायिक यांच्या अडचणींकडे दुर्लक्ष करून चालणार नव्हते. स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था ज्या कोकणात कार्यरत आहे, तेथील आंबा आणि मच्छी हे दोन प्रमुख व्यवसाय. ते अडचणीत असतील, तर त्याचा परिणामदेखील अर्थकारणावर मोठ्या प्रमाणावर होतो. त्यातच सोन्याच्या वाढीव किमती, त्यातील अस्थिरता याबाबत विचार करून संस्थेची धोरणे ठरवत असताना तारेवरची कसरत करावी लागली.

जागतिक अर्थकारण, डॉलर भक्कम होऊन रुपया घसरणे, होर्मुझ सामुद्रधुनी बंद झाल्याने कच्चे तेल, गॅस आदींची आयात ठप्प होणे, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये मोठी वाढ होणे या सगळ्यामुळे महागाई भडकणार हे समोर दिसते आहे. रुपयाचे होणारे अवमूल्यन, 'बॅलन्स ऑफ पेमेंट'वर येणारा प्रचंड दबाव या सर्व गोष्टी अप्रत्यक्षपणे संस्थेच्या अर्थकारणावर प्रभाव टाकणाऱ्या ठरतात. युद्ध भडकले, की सोन्याचे दर अधिक तेजीत येतात, हे समीकरण या वेळी चुकले. तेजीत असलेल्या दरांना अचानक ब्रेक लागला. काही वेळा तर ते कमी झाले. आता युद्ध भडकलेले असताना, शेअर बाजारही थंड असताना सोन्याच्या दरांना ब्रेक का लागला, असा प्रश्न पडू शकतो. कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमती हे त्यामागचे कारण आहे. त्यामुळे भांडवलाचा ओघ तिकडे वाढला आणि धावणारे सोने काहीसे वेग मंदावणारे झाले. आपल्या देशात रिझर्व्ह बँकेकडे ८८० मेट्रिक टन, तर देशवासीयांकडे ४० हजार मेट्रिक टन सोने आहे. त्यापैकी ८० टक्के सोने पाच लाखांच्या घरात उत्पन्न असलेल्या नागरिकांकडे आहे, असे प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीवरून स्पष्ट होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच एक वर्ष सोनेखरेदी न करण्याचे आवाहन केले. अत्यंत मौल्यवान असलेले परकीय चलन सोन्यावर खर्च होऊ नये. त्यापेक्षा ते वाचवून अधिक महत्त्वाच्या आयातीसाठी उपलब्ध राहावे, असा त्यामागचा उद्देश आहे. परकीय गंगाजळीवर येणारा ताण, रुपयाचे अवमूल्यन होत असल्याने अडचणींमध्ये झालेली भर लक्षात घेऊन वर्षाला होणारी ४४ लाख दशलक्ष डॉलरची आयात कमी झाली, तर त्याचा सकारात्मक परिणाम 'करंट बॅलन्स ऑफ पेमेंट पोझिशन'वर होईल. सद्यस्थितीत ते खूप महत्त्वाचे आहे. परकीय चलन कशासाठी राखून ठेवायचे, याचा निर्णय सरकार घेऊ शकते; पण यात पंतप्रधान मोदी देशवासीयांची साथ घेऊ इच्छितात.

संस्थेच्या दृष्टीने विचार करता आंबा, मच्छीचा हा हंगाम सकारात्मक नाही. अशा वेळी पतसंस्थेकडील सोनेतारण कर्जाची मागणी वाढणार आहे. या दृष्टीने प्लॅन तयार करावा लागणार आहे. सोनेतारणाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी लागणारा पैसा उभा करण्यासाठी ठेवींची उभारणी महत्त्वाची आहे. सोने खरेदी केले नाही, तरी असलेले सोने अर्थव्यवस्थेत चलन निर्माण करण्यासाठी वापरात आले, तर त्यामुळे अर्थकारण गतिमान करण्यासाठी उपयोग होणार आहे. तिजोऱ्यांमध्ये बंद असलेले सोने पतसंस्थेच्या माध्यमातून कर्जाऊ पैसा प्राप्त करण्यासाठी वापरले जात असल्याने येथील अर्थकारणाने पैशांचा स्रोत निर्माण होत आहे. याचा अर्थ संस्थेकडून दिले जाणारे सोनेतारण कर्ज हा संस्थेच्या व्यवसायाचा भाग असला, तरी त्याचे महत्त्व राष्ट्रहितासाठी आहे. मंदावलेल्या अर्थकारणात नवा पैसा प्रवाही करण्याचे काम संस्थेच्या माध्यमातून होत आहे.

माननीय पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देतानाच आपल्याकडे तिजोरीत बंदिस्त असलेले दागदागिने संस्थेकडे ठेवून, त्यावर कर्ज घेणे हा दागिन्यांची सुरक्षितता आणि पतनिर्मिती करून आपल्या उद्योग-व्यवसायाच्या गरजा पूर्णत्वाला नेण्याचा हा राजमार्ग आहे. अर्थकारणाच्या या बदललेल्या स्वरूपामध्ये स्वरूपानंद पतसंस्था चपखल बसून आपले अर्थकारण करताना ग्राहक सभासदांच्या गरजा, तसेच सभासद ठेवीदारांसाठी गुंतवणुकीच्या उत्तम संधी घेऊन सज्ज आहे. प्रत्येकाने आपण राष्ट्रासाठी काम करू शकतो, या आगळ्यावेगळ्या युद्धपरिस्थितीत राष्ट्रभक्त सैनिक म्हणून आपण कसा सहयोग देऊ शकतो, हे पाहावे. ते कर्तव्य पार पाडण्यासाठी स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचा ४९ हजारांचा अर्थपरिवार आर्थिक सहयोगाकरिता सज्जतेने सक्रिय आहे. जगातील चौथी अर्थव्यवस्था म्हणून उदयास आलो असलो, तरी दरडोई उत्पन्नात भारत जागतिक क्रमवारीत पहिल्या ५० राष्ट्रांतही नाही. हे लक्षात घेता पंतप्रधानांनी केलेल्या सोनेखरेदी न करण्याच्या आवाहनाला प्रत्येक राष्ट्रप्रेमी, जबाबदार नागरिक समजूतदारपणे नक्की प्रतिसाद देईल, याबाबत शंका नाही.



**- ॲड. दीपक पटवर्धन**

**वर्ष : १, अंक : २.** RNI No. MHMAR/25/A4199. मे २०२६. *पाने १६. *किंमत ५ रुपये
'स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था म., रत्नागिरी जिल्हा' या पतसंस्थेचे 'स्वरूप सहकार' हे मासिक सिद्धिविनायक प्रिंटर्स, कारवांचीवाडी, रत्नागिरी' येथे छापून प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी – ४१५६१२ येथे प्रसिद्ध केले. **संपादक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **कार्यकारी संपादक :** अनिकेत कोनकर. **मुद्रक, प्रकाशक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **मांडणी आणि सजावट :** कोकण मीडिया, एटीएमएस ग्राफिक्स. **संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :** प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी – ४१५६१२. **संपर्क :** (०२३५२) २२१२६३/२९५३६३. **वेबसाइट :** https://swaroopanandpatsanstha.com/ **ई-मेल :** swaroopsahakarrtn@gmail.com
**Volume : 1, Issue : 2. May 2026**
This Monthly Swaroop Sahakar printed and published by Adv. Deepak Manohar Patwardhan, on behalf of Swami Swaroopanand Sahakari Patsanstha Ltd., Ratnagiri and printed at Siddhivinayak Printers, Karwanchiwadi, Ratnagiri and published at Presidency Business House, Opp. S. T. Stand, Ratnagiri – 415612. **Editor :** Adv. Deepak Manohar Patwardhan. **Executive Editor :** Aniket Konkar

# काळ्या पैशाला अजिबात थारा न देणारी स्वामी स्वरूपानंद पतसंस्था

**स्वयंशिस्त राखून व्यवसाय केला, तर पतसंस्था किती शुभ्रधवल यश प्राप्त करू शकते, याचे आदर्श उदाहरण म्हणजे रत्नागिरीतील स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था. सातत्यपूर्ण प्रमाणबद्ध अर्थकारणाला कायद्याच्या परीघाचे कोंदण दिलेल्या या पतसंस्थेने काळ्या पैशाला अजिबात थारा मिळू नये यासाठी सक्षम यंत्रणा विकसित केली आहे. तेवढ्यावरच ती संस्था थांबलेली नाही, तर त्या यंत्रणेची काटेकोर अंमलबजावणीही केली जाते. त्यातून विश्वासार्हता आणि स्वतःची प्रगती या दोन्ही गोष्टी संस्थेने प्राप्त केल्या आहेत. हे नेमके कसे साध्य झाले, याविषयीचा हा लेख...**

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था सातत्याने उत्तम आर्थिक व्यवहार करत आली. वाढत्या ठेवी, वाढते कर्जवितरण, विक्रमी म्हणावी अशी कर्जवसुली, शाखाविस्तार, उत्तम गुंतवणुका, भरपूर स्वनिधी, वाढता नफा, सातत्याने वाढता ग्राहक सभासदवर्ग, उत्तम ग्राहकसेवा देण्याचे ब्रीद घेऊन काम करणारा सेवकवर्ग या सगळ्यातून स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेची विश्वासार्ह प्रतिमा तयार झाली आहे. हे सगळे घटक अत्यंत महत्त्वाचे आहेतच; पण आवर्जून नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे सहकार कायद्याच्या परिघात राहून काम करत असताना पतसंस्था आयकर कायदा, रिझर्व्ह बँकेचे ढोबळ निकष, दिवाणी न्यायसंहिता, महसूल कायदे अशा विविध कायद्यांच्या तरतुदींनाही बांधील राहून काम करत असते.

## शुभ्रधवल व्यवहार

काळ्या पैशाला अजिबात थारा न देणारी अर्थात संपूर्णपणे शुभ्रधवल, पारदर्शक व्यवहार असलेली, करड्या आर्थिक शिस्तीची, नियमांचे काटेकोर पालन करून ग्राहकांना उत्तम सेवानुभव देणारी अशी ही स्वामी स्वरूपानंद पतसंस्था आहे. ॲड. दीपक पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली या पतसंस्थेने गेल्या ३५ वर्षांत आर्थिक प्रगती तर साधली आहेच; पण आपल्या काटेकोर, शिस्तबद्ध आणि वैध मार्गाने केलेल्या वाटचालीमुळे 'काळ्या पैशाला अजिबात थारा न देणारी पतसंस्था' अशीही ओळख या पतसंस्थेने तयार केली आहे. अर्थातच, ही ओळख काही अचानक निर्माण झालेली नाही. सुरुवातीपासून कटाक्षाने काटेकोरपणे केलेले व्यवहार हे त्याचे कारण आहे. या वाटचालीविषयी ॲड. दीपक पटवर्धन यांनी दिलेली माहिती जाणून घेऊ या. ही वाटचाल कोणत्याही आर्थिक संस्थेसाठी आदर्शवत अशीच आहे. कोणत्याही पद्धतीने काळ्या पैशाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न पतसंस्थेने कधीही केला नाही. सातत्यपूर्ण प्रमाणबद्ध अर्थकारणाला कायद्याच्या परिघाचे कोंदण हे संस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.




## विश्वासार्ह वाटचाल

विश्वासार्ह संस्था म्हणून स्वरूपानंद पतसंस्थेने जनमानसामध्ये मोठे स्थान निर्माण केले आहे. संस्थेचे आर्थिक रिझल्ट नेहमीच उत्तम असतात. संस्थेची वाढ प्रमाणबद्ध पद्धतीने होत असून, त्यामध्ये सातत्य आहे. गेल्या ३५ वर्षांमधील संस्थेची प्रगती थक्क करणारी आहे.

ठेवी : १० हजार रुपयांपासून सुरू झालेला ठेवींचा प्रवास आज ४०० कोटी रुपयांच्या पलीकडे गेला आहे.

कर्जवितरण : शून्यापासून सुरुवात करून आज पतसंस्थेने ३१० कोटी रुपयांपर्यंतच्या कर्जवितरणाचा टप्पा यशस्वीरीत्या गाठला आहे.

सुरक्षित गुंतवणूक : १६७ कोटी रुपयांची सुरक्षित गुंतवणूक संस्थेने केली आहे.

भरभक्कम स्वनिधी : संस्थेकडचा स्वनिधी आज ५५ कोटी रुपयांच्या घरात आहे.

सभासदांची संख्या : ३०० सभासदांपासून सुरुवात केलेली ही संस्था आज ४९ हजार सभासदांच्या एका मोठ्या कुटुंबात रूपांतरित झाली आहे.

आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि आर्थिक परिस्थितीनुरूप घेतलेले योग्य निर्णय यामुळे स्वरूपानंद पतसंस्थेचे अर्थकारण दिवसागणिक अधिक उत्तम होत आहे. ग्राहक सभासदांची संख्या मोठी असली, तरी त्यांना संस्था कायम उत्तम सेवाच देत आली असून, शिस्त आणि पारदर्शकता या तत्त्वांना कधीही अंतर दिले जात नाही.

## स्वयंशिस्त अत्यंत महत्त्वाची...

सहकारी पतसंस्थांवर भारतीय रिझर्व्ह बँकेचा (आरबीआय) कोणताही थेट अंकुश नसतो आणि बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट पतसंस्थांना लागू होत नाही. महाराष्ट्र सहकार कायदा १९६० आणि त्या अनुषंगाने असलेल्या

नियमांनुसार पतसंस्था चालवल्या जातात. पतसंस्थांचे नियमन सहकार खाते करते. पतसंस्थांवर नियंत्रण ठेवणारी 'आरबीआय'सारखी स्वतंत्र, सक्षमी अशी यंत्रणा/व्यवस्था नसल्यामुळे प्रत्येक पतसंस्थेला स्वतःची शिस्त आणि स्वतःची कार्यपद्धती सहकार कायद्याच्या परीघात राहून तयार करणे आणि त्या अनुषंगाने कार्यान्वयन करणे अत्यंत महत्त्वाचे असते. स्वरूपानंद पतसंस्थेने पहिल्यापासूनच आपली आर्थिक शिस्त चोख ठेवली आहे. त्या शिस्तीसाठी जे नियम तयार केलेले आहेत, त्यांचे काटेकोर पालन संस्थेने केले.

## बदलत्या अर्थकारणाचा विचार

आपल्या कार्यक्षेत्रामध्ये काम करत असताना आपल्या कार्यक्षेत्रातील गरजा काय, आपल्या ग्राहकांच्या गरजा काय, गुंतवणुकीच्या कोणत्या संधी आहेत, कर्जवितरणाचा कोणता भाग आपल्याला उपयुक्त आहे, याचा पतसंस्था कायम अभ्यास करते. रत्नागिरी जिल्ह्यात पूर्वीपासून हंगामी अर्थात सीझनल अर्थकारण आहे. कारण आंबा आणि मच्छीमारीवर ते प्रामुख्याने अवलंबून होते. म्हणून ३५ वर्षांपूर्वी संस्थेने आपली धोरणे, योजना याच व्यवसायांना पूरक अशी तयार केली होती; मात्र आता येथील अर्थकारण केवळ आंबा आणि मच्छिमारीवर अवलंबून राहिलेले नाही. नोकरदार वर्गाचा सहभाग वाढला आहे. या बदलत्या गरजा लक्षात घेऊन संस्थेने आपल्या धोरणांमध्ये लवचिकता आणली आणि यश प्राप्त केले. अर्थात, आजही आंबा आणि मच्छिमारी व्यवसाय करणारा मोठा वर्ग संस्थेचा ग्राहक आहे; मात्र काळानुसार अर्थकारणाचा बाज बदलत गेला आहे आणि त्यानुसार पतसंस्थेने आवश्यक त्या सुधारणा केल्या आहेत.

## कायद्याचे पालन आणि पारदर्शकता

रिझर्व्ह बँकेसारखी कोणतीही स्वतंत्र व्यवस्था नसल्याने स्वतःची धोरणे स्वतः ठरवणे, स्वतःचे आर्थिक निर्णय स्वतः घेणे, कर्जाची मागणी आणि त्याचबरोबर ठेवींच्या माध्यमातून उपलब्ध होणारा पैसा हे समीकरण योग्य पद्धतीने पुढे चालवणे, कर्जवितरणाच्या वेळी उचित असा निर्णय घेणे या गोष्टी पतसंस्था चालवताना महत्त्वाच्या ठरतात. पतसंस्था चांगल्या पद्धतीने चालवण्यासाठी सहकार कायद्याच्या परीघात राहून स्वतःची धोरणे, स्वतःचे नियम तयार करणे आणि स्वयंशिस्तीने त्यांचे पालन करणे गरजेचे असते. आयकरासारखे कायदे पतसंस्थांवरही बंधनकारक असतात. त्यामुळे पतसंस्थांनी स्वतःचा विस्तार विश्वासार्ह पद्धतीनेच करणे गरजेचे आहे. या बाबी तत्त्वतः मान्य करून त्याच सकारात्मकतेने पुढील वाटचाल केली, तर यशप्राप्ती नक्की होते, हे स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या उदाहरणावरून स्पष्ट होते.

स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने आर्थिक शिस्त सांभाळली, विश्वासार्हता प्राणपणाने जपली आणि पतसंस्थांना लागू असणारे सर्व कायदेकानू लक्षात घेऊन, ते पाळले जातील या पद्धतीनेच आपली कार्यपद्धती विकसित केली. आर्थिक शिस्तीला बळकटी देणाऱ्या या नियमांचे पालन केल्यानेच पतसंस्थेतील व्यवहार स्वच्छ आणि नियमित म्हणून गणले जातात. काळा पैसा पांढरा होण्याचे माध्यम आपण होणार नाही, यासाठी आवश्यक ती सर्व प्रकारची काळजी स्वामी स्वरूपानंद पतसंस्था घेते. संस्था आपले आयकर रिटर्न्स, आपले टॅक्स ऑडिट, आपला जीएसटी रिटर्न अत्यंत नियमितपणे सादर करते. कोणताही आर्थिक व्यवहार लपवला जात नाही. हे सर्व रिटर्न वक्तशीर सादर केल्याने संस्थेच्या व्यवहारांमध्ये शिस्त राहते. याचबरोबर ठेवीदार, कर्जदार यांच्या योग्य ते कागद आपल्या दफ्तरी वागवत असते. ठेव फॉर्म, कर्ज फॉर्म उचित पद्धतीने स्वच्छ हस्ताक्षरात भरून घेण्याचा कटाक्ष संस्था नेहमीच पाळत आली आहे.

## केवायसी नियमांचे पालन

बँकांप्रमाणेच केवायसी (KYC) कायदा पतसंस्थांनाही लागू आहे. प्रत्येक ग्राहकाची संपूर्ण माहिती घेतल्याशिवाय स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेत खाते उघडले जात नाही. सुरुवातीपासूनच पतसंस्था त्याबाबत सजग राहिली. त्यामुळे नवे खाते उघडताना केवायसी कायद्यानुसार लागू असलेली सर्व कागदपत्रे त्याच्याकडून घेतलीच जातात. त्याशिवाय नवे खाते उघडले जात नाही. बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट थेट लागू नसला, तरी काही बाबतीत त्याचा आधार घेऊन सहकार कायद्यातील तरतुदी आणि सहकार खात्याने काढलेली परिपत्रके त्याच मार्गाने जात असतात. या साऱ्याचे भान स्वरूपानंद पतसंस्थेने कायम ठेवले आणि साऱ्या नियमांचे पालन केले.

'केवायसी'संदर्भातील निर्देशांचे तंतोतंत पालन पतसंस्था डोळ्यांत तेल घालून करते. ग्राहक सभासदाचे प्रारंभीचे फॉर्म, ठेव फॉर्म, कागदपत्रांची पूर्तता संस्थेच्या समक्ष होईल, हे संस्था कटाक्षाने पाहते. त्यामुळे बनावट कागद देऊन बनावट खाती आणि त्यातील व्यवहार अशा गोष्टींवर साहजिकच बंधन येते. बनावट स्वाक्षऱ्यांनी व्यवहार होऊ नयेत यासाठी प्रत्यक्ष ग्राहक समक्ष संस्थेत येऊन किंवा गरजेनुरूप सेवा म्हणून संस्थेचा कर्मचारी सेवा म्हणून ग्राहकासमक्ष जाऊन कागदपत्रांची पूर्तता होईल, याची खात्री केली जाते.

## रोख व्यवहारांची मर्यादा

आयकर कायद्यानुसार एक लाख ९० हजार रुपयांपर्यंतचे व्यवहार रोखीने करता येतात. या नियमाचे काटेकोर पालन स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेत केले जाते. एक लाख ९० हजार रुपयांच्या मर्यादेच्या वर एकही रुपया रोखीने स्वीकारला जात नाही किंवा त्या मर्यादेच्या बाहेर कोणालाही रोखीने रक्कम अदा केली जात नाही. केवळ ठेवी ठेवतानाच नव्हे, तर कर्जवितरण करताना, तसेच सोनेतारण कर्ज देताना, बचत खात्यातील रक्कम कोणी काढत असेल तेव्हाही या नियमाला कोणताही अपवाद केला जात नाही. काही वेळा ठेवीदार नाराज होतो, अन्य संस्थांची उदाहरणे देतो; मात्र स्वामी स्वरूपानंद संस्थेकडून मर्यादेचे उल्लंघन केले जात नाही. कर्जाचे हप्तेही रोख मर्यादा पाळूनच स्वीकारले जातात. थकलेले कर्जदार, अनियमित कर्जदार एकरकमी पूर्ण परतफेड रोखीने करतो असे सांगतात; पण या पतसंस्थेत एक लाख ९० हजारांच्या वर रोख रक्कम स्वीकारली जात नाही. ही मर्यादा नेमस्त पद्धतीने पाळली जात असल्याने सुरुवातीला नाराज झालेल्या सभासदाला संस्थेचे धोरण समजते आणि स्वामी स्वरूपानंद संस्थेची प्रतिमा अधिक स्वच्छ होते. पतसंस्था हा संस्कार केवळ आपल्या व्यवस्थेपुरताच राहू न देता ग्राहक सभासदांना रोख व्यवहार मर्यादा पाळण्यासाठी प्रवृत्त करते.

रोखीने मर्यादेबाहेर व्यवहार होत नसल्याने काळ्या व्यवहारांवरही बंधने येतात आणि खोटी खाती काढून त्यामार्फत व्यवहार करण्याच्या

# सुरक्षितता आणि भविष्य

स्वरूपानंद पतसंस्थेतील ठेवींवरील व्याजांचे दर योग्य आकडेमोड करून, अन्य ठिकाणच्या व्याजदरांचा अंदाज घेऊन आकारले जातात. स्वरूपानंद पतसंस्थेने आजपर्यंत सहकार कायद्याने घालून दिलेल्या मर्यादेच्या आतच ठेवी स्वीकारलेल्या आहेत. कर्जवितरणाच्या बाबतीतही कर्जाच्या व्याजदराच्या मर्यादा पतसंस्थेने उचित पद्धतीने पाळलेल्या आहेत. कर्जदार, ठेवीदार, अन्य सभासद यांना विश्वासार्ह वातावरणात आपले व्यवहार करता यावेत, याची दक्षता पतसंस्था कायम घेते. ग्राहकांच्या पैशांची सुरक्षितता ही पतसंस्थेच्या धोरणातील सर्वांत मौलिक गोष्ट आहे. प्रत्येक ग्राहकाचा पैसा या पतसंस्थेच्या माध्यमातून सुरक्षित पद्धतीनेच वितरित होईल, त्या पैशांचे योग्य पद्धतीने प्रचलन होऊन तो मोठ्या प्रमाणावर परत पतसंस्थेकडे येईल, अशा अर्थचक्रातून अभिसरण होऊन संस्थेची आर्थिक ताकद वाढत जाईल आणि त्या माध्यमातून आपल्या ग्राहक सभासदांना उचित पद्धतीच्या विश्वासार्ह सेवा वाढीव प्रमाणात देता येतील, अशा पद्धतीचे गणित पतसंस्था सातत्याने राबवत आली आहे. त्यामुळेच पतसंस्थेला शुभ्रधवल यश मिळाले असून, त्यात वाढ होत आहे, त्यात सातत्य आहे.

प्रवृत्तीलाही आळा बसतो. चेक, आरटीजीएस, एनईएफटी, बँक ट्रान्स्फर या माध्यमातूनच रक्कम स्वीकारणे अगर अदा करण्याचे व्यवहार होत असल्याने व्यवहारात पारदर्शकता येते. त्याचप्रमाणे सभासदांना जागृत करण्यासाठी ठेवीदारांना, कर्जदारांना संस्थेतील ठेवी, कर्जे आपल्या हिशेबात दाखवावीत, हे आवर्जून सांगितले जाते. कोणीही आयकर खात्याची दिशाभूल करून पतसंस्थेत ठेव ठेवू नये, यासाठी जागृती केली जाते.

## उद्गम करकपात (टीडीएस) तरतूद

चालू आर्थिक वर्षात (२०२६-२७) संस्थेचे उत्पन्न ५० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडणार आहे. आयकर कायद्याच्या नियमानुसार, एका वर्षात ५० कोटी रुपयांहून अधिक उत्पन्न मिळवलेल्या आर्थिक संस्थांना उद्गम करकपात अर्थात टीडीएस कपात अनिवार्य झालेले आहे. आतापर्यंत स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेला किंवा कोणत्याही सहकारी संस्थेला ठेवीदारांकडून टीडीएस कपात करणे बंधनकारक नव्हते; मात्र संस्थेच्या उत्पन्नाने ५० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडल्यावर टीडीएसचे सर्व निकष पतसंस्थांनाही लागू होतात. त्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने आवश्यक ती तयारी आधीपासून करायला सुरुवात केली आहे. २०२५-२६मध्ये पतसंस्थेचे उत्पन्न ४८ कोटी रुपये होते. चालू आर्थिक वर्षात ते ५० कोटींच्या वर जाणार असल्याने आतापासूनच ग्राहकांना टीडीएस कपातीसंदर्भात माहिती देणे, कोणाच्याही ठेवी कायद्याच्या कचाट्यात सापडू नयेत यासाठी आवश्यकतेनुसार ग्राहकांना तज्ज्ञांचे मत उपलब्ध करून देणे, या पद्धतीने स्वरूपानंद पतसंस्थेने ग्राहक जागरूकतेचा कार्यक्रम हाती घेतला आहे.

एका आर्थिक वर्षात सर्वसामान्य व्यक्तीचे व्याजउत्पन्न ५० हजारांच्या वर आणि ज्येष्ठ नागरिकांचे व्याजउत्पन्न एक लाखाच्या वर गेल्यावर टीडीएस कपात करावी लागते. एप्रिल २०२७पासून हे निकष स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेला लागू होतील. पुढच्या वर्षीपासून लागू होणार असलेल्या कायद्याचा विचार आधीच करून पतसंस्थेने त्याच्या अंमलबजावणीसाठी तयारी केली आहे. नियमपालनाबद्दल संस्था किती जागरूक आणि कटिबद्ध आहे, याची प्रचीती यावरून येते.

## तंत्रज्ञान आणि नियंत्रण

पतसंस्थांच्या अर्थकारणाचे नियम स्वतः लावून घ्यावे लागतात, पोटनियमांमध्ये ते असावे लागतात आणि स्वामी स्वरूपानंद पतसंस्था ते करते. कशा पद्धतीने गुंतवणूक केली जाते, कशा पद्धतीने त्रयस्थांशी व्यवहार (थर्ड पार्टी ट्रान्झॅक्शन्स) केले जातात, या सर्व बाबींसाठी योग्य ते धोरण स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने तयार केले आहे. जी थर्ड पार्टी ट्रान्झॅक्शन्स कायद्याने टाळायला सांगितलेली आहेत, ती स्वरूपानंद पतसंस्थेत कधीही झालेली नाहीत. ती होऊ नयेत, असा पतसंस्थेचा जागृतपणे प्रयत्न असतो. अर्थातच हे प्रयत्न तोकडे नाहीत किंवा नुसते सांगण्यापुरते नाहीत. त्यासाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था पतसंस्थेने तयार केली आहे. सीबीएस अर्थात कोअर बँकिंग प्रणाली स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने गेल्या २० वर्षांपासून स्वीकारली आहे. त्यामुळे सर्व व्यवहार ऑनलाइन पद्धतीने पाहता येतात. वाढत जाणाऱ्या सर्व शाखांच्या व्यवहारांवरही ऑनलाइन पद्धतीने नियंत्रण ठेवता येते. कोणत्याही चुकीच्या पद्धतीने किंवा वेड्यावाकड्या मार्गाने संस्थेच्या माध्यमातून होऊ नयेत, यासाठी पतसंस्थेने स्वतःची सिस्टीम आधीपासूनच विकसित केली आहे. म्हणूनच पतसंस्थेने विश्वासार्हता प्राप्त केली आहे.

स्वरूपानंद पतसंस्था आपल्या स्तरावर कायदेशीर आर्थिक व्यवहारांनाच प्राधान्य देते, हे या सगळ्यावरून लक्षात येते. संस्थेची सर्वंकष वाढ, सातत्य, वाढते व्यवहार सत्शील, स्वच्छ पैशाचे असावेत हा आग्रह धरूनच गेली ३५ वर्षे संस्थेचे मार्गक्रमण झाले आहे. यामुळे संस्थेबद्दल जनमानसात स्वच्छ, विश्वासार्ह प्रतिमा उभी राहिली. म्हणूनच स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेवर विश्वासून आर्थिक व्यवहार करणारा वर्ग सातत्याने वाढत जात आहे आणि स्वरूपानंदबरोबर संलग्न झालेला ग्राहक सभासद दीर्घ काळ संस्थेशी संलग्न राहतो. आर्थिक शिस्त, शुचिर्भूत व्यवहार, स्वच्छ प्रतिमेचा माहौल यांमुळे स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचे अर्थकारण सातत्याने खुलत गेलेले अनुभवता येते.


एकंदरीत सांगायचे झाले, तर स्वामी स्वरूपानंद ही केवळ एक पतसंस्था नसून, विश्वासाचे प्रतीक आहे. स्वरूपानंद पतसंस्थेच्या माध्यमातून होणारे सर्व व्यवहार कायद्याच्या परिभाषेत स्वच्छ आणि नियमित आहेत. कोणत्याही पद्धतीने दोन नंबरचा अर्थात काळा पैसा या व्यवस्थेत येऊच नये, याची सर्वतया काळजी घेणारी यंत्रणा (फुलप्रूफ सिस्टीम) संस्थेने विकसित केली आहे आणि तिची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जात आहे. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास दिवसेंदिवस वाढत आहे.

**(शब्दांकन : अनिकेत कोनकर)**




# सोने दरवाढ, सोनेतारण कर्जव्यवहार आणि पंतप्रधानांचे आवाहन

**गेल्या काही काळात सोन्याची सातत्याने दरवाढ होत आहे. त्यामुळे स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेसह कोकणपट्ट्यातील पतसंस्थांमधील सोनेतारण कर्जव्यवहारांमध्येही वाढ झाली आहे. त्याचा ग्राहकांना चांगला उपयोग झाला आहे. दरम्यान, आंतरराष्ट्रीय सद्यस्थितीनुसार, नागरिकांनी किमान वर्षभर तरी सोन्याची खरेदी करू नये, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. या सर्व घटकांचे विश्लेषण करणारा हा लेख...**




गेल्या सुमारे दीड एक वर्षामध्ये सोन्याची किंमत सातत्याने वाढती राहिली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर किंवा अर्थकारणावर याचा होणारा परिणाम याचे विश्लेषण वेगळ्या पद्धतीने करावे लागेल. परंतु, स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचा अध्यक्ष म्हणून या वाढीव सोन्याच्या किमतीचा काय परिणाम झाला, हे आपण पाहिले तर लक्षात येते, की या सोन्याच्या दरवाढीचा प्रचंड लाभ सोने तारण ठेवून पैसा उपलब्ध करणाऱ्या घटकांना झाला आहे.

## कोकणातील अर्थकारण आणि सोन्यातील गुंतवणूक


स्वरूपानंद पतसंस्थेचे मुख्य कार्यक्षेत्र रत्नागिरी जिल्ह्यात आहे. हा प्रामुख्याने किनारपट्टीचा भाग असून, आंबा उत्पादकांचाही पट्टा आहे. येथे विविध प्रकारचे छोटे-मोठे व्यवसाय करणारे व्यापारी मोठ्या प्रमाणावर आहेत. प्रामुख्याने आंबा व्यावसायिक, मुस्लिम समाज आणि मच्छिमार यांचा विचार केला, तर असे लक्षात येते, की त्यांच्याकडे बँक गुंतवणुकीपेक्षाही सोन्यामधील गुंतवणूक पूर्वीपासून अधिक प्रमाणात आहे. त्यामुळे सोन्याच्या वाढीव किमतीचा उपयोग करून घेऊन या घटकांनी पतसंस्थांच्या माध्यमातून सोनेतारण कर्ज घेऊन आपल्या व्यवसायासाठी किंवा तातडीच्या गरजांसाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल केली आहे.

## पतसंस्थांमधील सोनतारण कर्जाचे वाढते प्रमाण

कोकणपट्ट्यातील बहुतांश पतसंस्थांचा विचार केला, तर त्यांच्याकडे गेल्या वर्षभरात सोनेतारण कर्जांचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. अनेक पतसंस्थांमध्ये हे प्रमाण ७० टक्क्यांच्या आसपास गेले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे सोन्याचे वाढलेले भाव. पूर्वी प्रति तोळा ३० हजार, ३५ हजार, ५० हजार किंवा ७० हजार रुपये दराने खरेदी केलेल्या सोन्याची किंमत आता लाखाच्या पुढे गेली आहे. यामुळे प्रति ग्रॅम सोन्यावर मिळणाऱ्या कर्जाची रक्कम स्वाभाविकपणे वाढली आहे. याचा योग्य लाभ

**भारतीय रिझर्व्ह बँकेकडील सोन्याच्या साठ्यात झालेली वाढ**

आकडे टनांमध्ये
माहिती स्रोत : RBI




कोकणपट्ट्यातील कर्जदारांनी तरी मोठ्या प्रमाणावर करून घेतला आहे. आपल्याकडे असलेल्या सोन्याचा संयत पद्धतीने विनियोग करण्याचा पर्याय त्यांनी निवडला आहे. कर्जदारांनी आपले सोने केवळ तिजोरीमध्ये न ठेवता, स्वरूपानंदसारख्या पतसंस्थांकडे किंवा अशा अन्य वित्त संस्थांकडे ठेवण्याचा पर्याय निवडला. त्यामुळे ते सोने एक तर कस्टडीत म्हणजे अत्यंत सुरक्षित राहते आणि त्यातून उत्पादक कामांसाठी पैसाही निर्माण केला आहे. त्यामुळे सोने तारण कर्जाला या परिप्रेक्ष्यामध्येही महत्त्व आहे.

## आपत्कालीन गरज आणि सावकारी पाशातून सुटका

बँका किंवा पतसंस्थांच्या माध्यमातून होणाऱ्या सोनेतारण कर्जव्यवहारांमुळे गोरगरीब जनतेला एक मोठा आधार मिळतो. ज्यांना तातडीने पैसा हवा असतो - मग तो व्यावसायिक संधी साधण्यासाठी असो, मुलांच्या शिक्षणासाठी असो, वैद्यकीय गरजांसाठी असो किंवा घरगुती अडचणींसाठी असो – त्यांना सोनेतारण कर्जामुळे फार औपचारिकता न करता पटकन पैसा उपलब्ध होतो. पतसंस्था किंवा बँकांनी या प्रकारे सोनेतारण व्यवसाय केले नाहीत, तर हे व्यवहार सावकारांच्या पाशात जाऊ शकतात. एकदा माणूस सावकारी पाशात अडकला, की त्याच्यावरचे गंडांतर वाढत जाते, तो त्यात रुतत जातो. या दुष्टचक्रापासून समाजाला वाचवण्यासाठी पतसंस्था आणि बँकांच्या माध्यमातून होणारा सोनेतारण कर्जपुरवठा अत्यंत महत्त्वाची भूमिका निभावतो.

पंतप्रधानांचे आवाहन आणि राष्ट्रहित

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला सोने खरेदी न करण्याचे आवाहन नुकतेच केले आहे. या आवाहनामागे परकीय गंगाजळी वाचवणे हा मुख्य उद्देश आहे. सोन्यासारख्या पडून राहणाऱ्या धातूवर खर्च न करता अन्य उपयुक्त कारणांवर ती खर्च व्हावी, हा उद्देश त्यामागे आहे.

सोन्याचा साठा

गेली दोन वर्षे भारतीय बँकांनी, प्रामुख्याने रिझर्व्ह बँकेने मोठी सोनेखरेदी केली आहे. भारताचा सोन्याचा साठा ८८०.५२ मेट्रिक टनांपर्यंत गेलाय. त्यातही ७७ टक्के सोने देशातच आणले गेले आहे. परकीय चलन गंगाजळीमध्ये १६.७० टक्के वाटा सोन्याचा आहे. ही आकडेवारी केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहे. भारतातील नागरिक, देवस्थाने यांच्याकडचा सोन्याचा साठा ४० हजार टन एवढा आहे. हा आकडा जगातील सर्व बँकांकडे असलेल्या सोन्याच्या साठ्यापेक्षाही खूप अधिक आहे. जगातील बँकांकडे असलेले सोने ३६ हजार टन आहे. या पार्श्वभूमीवरही पंतप्रधानांचे आवाहन महत्त्वाचे ठरते.

## सोन्याची 'डेड इन्व्हेस्टमेंट'

सोने आपल्या देशात उत्पन्न होत नाही. ते आपल्याला आयात करावे लागते. ही आयात करण्यासाठी आपल्याला परकीय चलन आणि प्रामुख्याने डॉलर खर्च करावे लागतात. हे सोने आयात झाल्यानंतर देशातील ग्राहक भावनिक, धार्मिक आणि गुंतवणूक म्हणून मोठ्या प्रमाणावर सोन्याची खरेदी करतात. सोन्याचे एक तर दागिने बनवले जातात अथवा ते तिजोऱ्यांमध्ये पडून राहते. ती 'डेड इन्व्हेस्टमेंट' ठरते. त्यातून नवीन उत्पन्न होत नाही. म्हणजेच मौल्यवान परकीय चलन खर्च करून आणलेल सोने एकार्थी नुसते पडून राहते. देशाला कच्च्या तेलासारख्या अत्यावश्यक बाबी आंतरराष्ट्रीय स्थितीमुळे चढ्या दराने आपले परकीय चलन खर्च करून आयात करणे आवश्यक असताना केवळ मौल्यवान




म्हणून आपल्या खजिन्यात ठेवण्यासाठी परकीय चलन खर्च करणे हे व्यवहार्य नाही. आपला आयात खर्च वाढतोय आणि निर्यातीवर मर्यादा आहेत. अमेरिकेच्या टॅरिफ खेळामुळे आपली डॉलर आवकही प्रभावित झाली आहे.

## आंतरराष्ट्रीय ताण

आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे सगळीकडे प्रचंड दडपण आहे. अशा स्थितीत आपल्याकडे उपलब्ध असणारे परकीय चलन कसे खर्च करावे, याकडे पूर्ण लक्ष देऊन, धोरण ठरवून बदलती परिस्थिती लक्षात घेऊन खर्च करण्यातच शहाणपण आहे. त्यामुळे देशांतर्गत बाजारपेठेत मागणी असलेले सोने खरेदी करून परकीय चलन या अनावश्यक गोष्टीसाठी खर्च करावे की देशाची गती सुरू ठेवण्यासाठी लागणारे कच्चे तेल, संरक्षण साधने अशा अन्य महत्त्वाच्या गोष्टींच्या खरेदीसाठी हे परकीय चलन राखून ठेवावे, हा निर्णय सरकार घेऊ शकते; पण या निर्णयात पंतप्रधान देशवासीयांची साथ घेऊ इच्छितात. येणारी महागाई, वाढणाऱ्या किमती हे घटक पाहता गरीब, मध्यमवर्ग यांना सद्यस्थितीत सोनेखरेदी हे दिवास्वप्नच ठरणार आहे. त्यामुळे सोने खरेदी न करण्याचे हे आवाहन वास्तववादी आहे. सोनेखरेदी न केल्याने आपण एक प्रकारे परकीय चलन वाचवून राष्ट्रकार्याला हातभार लावू शकू. त्यामुळे जबाबदार नागरिक म्हणून या आवाहनाला साथ देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

## धोरणात्मक उद्दिष्ट

सध्या जागतिक स्तरावर काही ठिकाणी प्रत्यक्ष शस्त्रास्त्रांचे युद्ध सुरू आहे, तर काही ठिकाणी 'टेबल वॉर्स' किंवा धोरणांच्या माध्यमातून युद्ध लढले जात आहे. अमेरिकेचे टॅरिफ धोरण हा त्यातीलच एक प्रकार आहे. अशा सर्वच प्रकारच्या युद्धजन्य परिस्थितीत प्रत्येक नागरिकाने



स्रोत: RBI वार्षिक अहवाल

राष्ट्रहिताचा विचार करणे आवश्यक आहे. पंतप्रधानांनी केलेले आवाहन हे नागरिकांना या आर्थिक लढाईत सहभागी करून घेण्यासाठी आहे. सोनेखरेदीचा परकीय चलनाचा खर्च नियंत्रणात आणून तो अन्य ठिकाणी करावा, हे यामागचे धोरणात्मक उद्दिष्ट आहे.

सध्याच्या आंतरराष्ट्रीय स्थितीत कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडल्या आहेत; मात्र आपल्याला ते आयात करण्यावाचून पर्यायच नाही. अशा वेळी परकीय गंगाजळी योग्य ठिकाणीच खर्च होणे गरजेचे आहे. देशाच्या आर्थिक मजबुतीकरणासाठी आणि आर्थिक युद्धात देशाला खंबीरपणे साथ देण्यासाठी पंतप्रधानांनी केलेले हे आवाहन जनसामान्यांनी उचलून धरणे गरजेचे आहे.

**- ॲड. दीपक पटवर्धन**

---

## स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या सोनेतारण कर्जाची वैशिष्ट्ये



भारतीयांच्या दृष्टीने सोने हा केवळ गुंतवणुकीचा विषय नसून भावनिक जिव्हाळ्याचाही भाग आहे. अशा या सोन्याचा उपयोग गरजेच्या काळात तातडीने आर्थिक मदत उभी करण्यासाठी होतो. हीच गरज लक्षात घेऊन स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने सोनेतारण कर्जसुविधा प्रभावीपणे उपलब्ध करून दिली आहे. स्वामी स्वरूपानंद पतसंस्था ग्राहकांच्या सोयीला प्राधान्य देऊन झटपट कर्जवितरण करते. अवघ्या २० ते २५ मिनिटांत कर्ज मंजूर करून ग्राहकांना रक्कम दिली जाते. त्यामुळे ग्राहकांचा वेळ वाचतो आणि त्यांचा पूर्ण दिवस खर्ची पडत नाही.

सोनेतारण कर्ज विभागात महिला कर्मचारी नेमण्यात आल्या आहेत. त्यामुळे महिलांना कोणताही संकोच न वाटता व्यवहार करता येतो. अर्जाची प्रक्रिया पूर्णपणे संगणकीकृत असल्याने ग्राहकांना एकच माहिती पुन्हा पुन्हा द्यावी लागत नाही. सोन्याची शुद्धता तपासण्यासाठी आधुनिक यंत्रांचा वापर केला जातो. त्यामुळे योग्य मूल्यमापन होऊन ग्राहकांना जास्तीत जास्त कर्ज उपलब्ध करून देता येते. या माध्यमातून एक कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज मिळू शकते.

कर्जाचा व्याजदर ग्राहकाची गरज, तारणातील सोने आणि परतफेडीची मुदत यांनुसार निश्चित केला जातो. तो ग्राहकांना परवडणारा राहील, याची काळजी घेतली जाते. गरजेनुसार व्याज भरून घेऊन परतफेडीचा कालावधी बदलून अधिक कर्ज उपलब्ध करून देण्याचाही प्रयत्न केला जातो. मुदत संपल्यानंतरही आवश्यकतेनुसार कर्जाचे नूतनीकरण करून दिले जाते. त्यामुळे दागिन्यांच्या लिलावाचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

पतसंस्थेची आणखी एक महत्त्वाची सुविधा म्हणजे अंशतः दागिने सोडवण्याची सोय. ग्राहकाने आवश्यक तेवढी रक्कम भरल्यास संपूर्ण कर्जफेड होण्यापूर्वीही संबंधित दागिना परत दिला जातो. सोन्याशी असलेल्या भावनिक नात्याची जाणीव ठेवून ही सुविधा दिली जाते.

तारणातील दागिन्यांच्या सुरक्षिततेसाठी सर्व शाखांमध्ये नामांकित कंपनीच्या अत्याधुनिक तिजोऱ्यांचा वापर केला जातो. तसेच अनुभवी सोनारांकडून योग्य मूल्यमापन केले जाते. व्यावसायिकता आणि भावनिकता यांचा समतोल राखत सोनेतारण कर्जसुविधा देणे, हेच स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचे वैशिष्ट्य आहे.



# षष्ट्यब्दीपूर्तीचा तत्त्वनिष्ठ, प्रेरक प्रवास!

**ज्यांच्या सक्षम नेतृत्वाखाली स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने धवल यश प्राप्त केले, त्यात सातत्य राखले आणि नवनवी शिखरे पादाक्रांत केली, ते संस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक मनोहर पटवर्धन यांच्या वयाने हीरकमहोत्सवी टप्पा ओलांडला आहे. २७ मे १९६६ रोजी रत्नागिरीत जन्मलेल्या पटवर्धन यांनी सहकार, बँकिंग, राजकारण, वाचक चळवळ अशा विविध सामाजिक क्षेत्रांमध्ये आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त हा विशेष लेख....**

**दिवस :** ३१ मार्च
**वेळ :** संध्याकाळी चार वाजता
**ठिकाण :** स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे रत्नागिरी येथील प्रधान कार्यालय
**कार्यक्रम :** अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांची पत्रकार परिषद
**विषय :** पतसंस्थेचा वार्षिक ताळेबंद जाहीर करणे

हे वेळापत्रक पाळण्यामध्ये गेल्या अनेक वर्षांत कधीही खंड पडलेला नाही. बँका, पतसंस्था किंवा कोणत्याही आर्थिक संस्थेसाठी ३१ मार्च हा दिवस आणि त्याआधीचे कित्येक दिवस (आणि काही संस्थांसाठी नंतरचेही काही दिवस) म्हणजे जणू एखादी शिक्षा वाटावी, असेच असतात. 'मार्च एंडिंग'ची कामे आहेत हा तर या काळात अगदी परवलीचाच शब्द झालेला असतो. त्याची कारणे प्रत्येक संस्थेनुसार वेगवेगळी असतील; पण रत्नागिरीतील स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था मात्र त्याला अपवाद आहे. ३१ मार्च या आर्थिक वर्षाच्या अखेरच्या दिवशीच्या आर्थिक व्यवहारांची मुदत संपल्यावर अवघ्या तासभरात थेट पत्रकार परिषद घेऊन आपली वर्षभरातील कामगिरी जाहीर करणे ही अजिबात सोपी गोष्ट नाही; मात्र स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने अनेक वर्षांपूर्वी हा पायंडा पाडला आणि तिथपासून कधीही त्यात खंड पडलेला नाही. संस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक मनोहर पटवर्धन यांच्या सक्षम नेतृत्वाचा दाखला देणारे हे एक उदाहरण आहे.

'कल करे सो आज आणि आज करे सो अब' याचे आदर्श उदाहरण म्हणजे ही संस्था. कोणत्याही आर्थिक संस्थेसाठी शिस्त अत्यंत महत्त्वाची असते, हे तत्त्व स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने केवळ पुस्तकात ठेवले नाही, तर त्याची तंतोतंत अंमलबजावणी केली. त्यामुळेच संस्थेच्या सर्व व्यवहारांच्या आवश्यक त्या नोंदी वेळच्या वेळी पूर्ण करण्याचा दंडक ॲड. पटवर्धन यांनी घालून दिला आहे. त्यामुळे संस्थेसाठी रोजचा दिवसच जणू '३१ मार्च'प्रमाणे असतो, असे म्हटले तरी हरकत नाही. अर्थात हे शक्य होण्यामागचे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे ते म्हणजे संस्थेच्या व्यवहारांमधील नैतिकता, पारदर्शकता आणि कायद्यांचे पूर्ण पालन. व्यवहार पारदर्शक नसतील, कायद्याचे उल्लंघन करणारे असतील तर त्यांचा हिशेब वेळच्या वेळी देणे शक्य होणारच नाही. स्वरूपानंद संस्थेत सारे व्यवहार स्वच्छ आणि काटेकोर असल्याने लपवण्यासारखे किंवा सारवासारव/फिरवाफिरव करून दाखवण्यासारखे काही नसतेच. त्यामुळेच ३१ मार्चला रिझल्ट्स जाहीर करणे ही संस्थेसाठी केवळ एक औपचारिकताच असते. म्हणूनच स्वरूपानंद पतसंस्था म्हणजे विश्वासार्हतेचे दुसरे नाव, असा नावलौकिक संस्थेने आपल्या ३५ वर्षांच्या वाटचालीतून मिळवला आहे. ज्या स्वामी स्वरूपानंदांच्या नावाने ही पतसंस्था चालवली जाते, त्यांच्याशी प्रतारणा होईल असा छोटासाही व्यवहार पतसंस्थेतून चुकूनही होऊ नये, म्हणून ॲड. पटवर्धन पहिल्या दिवसापासून निरंतर कष्ट घेत आहेत आणि त्यांच्या मुशीत घडलेली टीमही त्यांच्या या कष्टांना पुरेपूर साथ देत आहे. पत्रकार परिषद असो किंवा एरव्हीही कधी काही सांगताना असो, पतसंस्थेची अगदी त्या दिवसापर्यंतची आकडेवारी पटवर्धन सरांच्या अगदी तोंडावर असते. कारण ते फक्त नामधारी अध्यक्ष नाहीत, तर त्यांच्या नसानसांमध्ये स्वामी स्वरूपानंद पतसंस्था सळसळते आहे.

आजचे युग स्पर्धेचे आहे. त्यामुळे एकाच क्षेत्रातील संस्थांमध्ये स्पर्धा असतेच आणि त्यात काही वावगेही नाही; पण या स्पर्धेच्या आहारी जाऊन स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने कधीही

ग्राहकांचा अनुनय करणारे व्याजदर दिल्याचे उदाहरण अपवाद म्हणूनही सापडणार नाही. ग्राहकांनी संस्थेची पारदर्शकता, विश्वासार्हता आणि पैशांची सुरक्षितता याकडे पाहून ठेवी ठेवल्या पाहिजेत, असे पटवर्धन सरांचे म्हणणे असते. राज्य पतसंस्था फेडरेशनचे कार्याध्यक्ष, तसेच रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक या नात्याने त्यांचा संबंध अनेक पतसंस्थांशी, वित्तसंस्थांशी येतो. त्या नात्याने आपल्या संस्थेच्या यशामागची कारणे अन्य संस्थांना सांगतानाही पटवर्धन सर हातचे काही राखून ठेवत नाहीत. मी स्वतः याचा प्रत्यक्ष साक्षीदारही आहे. एकदा पटवर्धन सरांकडे गेलो होतो, तेव्हा दुसऱ्या एका जिल्ह्यातील पतसंस्थेचे प्रतिनिधी स्वरूपानंदच्या ३१ मार्च रोजी हिशेब जाहीर करण्याच्या पराक्रमाचे रहस्य जाणून घेण्यासाठी आलेले होते. आपल्या संस्थेची सगळी पत्रके, नियम, पोटनियम, नोंदी या सगळ्या गोष्टी पटवर्धन सरांनी त्यांना अगदी बारकाईने उलगडून दाखवल्या. संस्थेच्या हितासाठी पोटनियमांमध्ये बदल करणे कसे आवश्यक आहे, त्याचा नेमका कसा उपयोग होतो, संस्थेच्या प्रगतीसाठी नेमके काय काय केले पाहिजे, हे जाणून घेतल्यावर त्या प्रतिनिधींना झालेला आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. वास्तविक, स्पर्धा लक्षात घेता एका संस्थेने ही माहिती दुसऱ्या संस्थेला देणे अभिप्रेत नाही; मात्र सहकारी पतसंस्था चळवळीच्या हितासाठी/प्रगतीसाठी आवश्यक त्या कोणत्याही गोष्टी करण्यासाठी पटवर्धन सर मागेपुढे पाहत नाहीत. म्हणजे दोन्ही बाजूंनी विचार केल्यास स्वामी स्वरूपानंद पतसंस्था स्पर्धेच्या पलीकडे गेलेली आहे. सक्षम नेतृत्वाशिवाय अशी कामगिरी शक्य नाही.

ठेवी स्वीकारणे, कर्जे देणे याबरोबरच कर्जांची पूर्ण वसुली करणे हे आर्थिक संस्थेच्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक असते. त्यासाठी पटवर्धन सरांनी सुरुवातीपासूनच प्रसंगी स्वतः प्रत्यक्ष फिल्डवर वसुलीसाठी जाऊनही स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेची काटेकोर यंत्रणा विकसित केली आहे. मुळात कर्ज देतानाच संबंधित व्यक्तीची परतफेडीची पात्रता पाहून निकषांत बसणाऱ्या व्यक्तींनाच कर्जे दिली जातात. तिथे राजकीय किंवा अन्य कोणत्याही पातळीवरून ढवळाढवळ केली जात नाही. पटवर्धन सरांनी प्रत्येक शाखाधिकाऱ्यांना त्याबाबतचे अधिकार दिले आहेत. एखादे कर्जप्रकरण संबंधित शाखाधिकाऱ्यांनी नाकारले असेल, तर त्याचा तिथेच निकाल लागतो; तरीही ते प्रकरण मुख्यालयापर्यंत आले, तर शाखाधिकाऱ्यांनी नाकारलेल्या कर्जप्रकरणाला पटवर्धन सरांकडून कधीही होकार मिळत नाही. हे सर्वांना पुढे घेऊन जाणाऱ्या आणि आपल्या सहकाऱ्यांना पूर्ण स्वातंत्र्य देणाऱ्या नेतृत्वाचे उदाहरण तर आहेच. शिवाय त्यामुळे चुकीची कर्जे दिलीच जात नाहीत. म्हणूनच संस्थेची वसुली सातत्याने ९९ टक्क्यांपेक्षा अधिक आहे आणि नेट एनपीए (म्हणजे अनुत्पादक मालमत्ता) शून्य टक्के आहे. ही अत्यंत आदर्शवत अशी स्थिती आहे. वसुलीसाठी इतकी करडी शिस्त असलेल्या पतसंस्थेने व्याजमाफी दिली होती असे सांगितले तर पटकन कोणाला खरे वाटणार नाही; पण स्वरूपानंद पतसंस्थेने त्याही बाबतीत आदर्श घालून दिला आहे. कोरोनाचा काळ संपूर्ण जगाचीच परीक्षा पाहणारा होता. त्या वेळी आलेल्या आरोग्यसंकटाने नंतर सगळ्या जगावरच अर्थसंकट आणले. त्या काळात प्रत्येक वित्तसंस्थेला आपल्या वसुलीची काळजी होती; मात्र योग्य धोरणांच्या काटेकोर अंमलबजावणीमुळे भक्कम आर्थिक स्थिती असलेल्या स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने कोरोना काळात कर्जदारांच्या एका महिन्याच्या कर्जाचे व्याज भरण्यासाठी नफ्यातून ७५ लाख रुपयांचा निधी दिला होता! अर्थातच, असे करणारी ही राज्यातील पहिली पतसंस्था ठरली, हे वेगळे सांगायला नकोच! अर्थातच संवेदनशीलता असलेले नेतृत्वच असा निर्णय घेऊ शकते. 'संकटकाळात कर्ज किंवा कर्जव्याजमाफीची मागणी अनेकदा होते; मात्र स्वतःच्या नफ्यातून कर्जदारांच्या मदतीसाठी धावून जाणारी मी पाहिलेली ही पहिलीच पतसंस्था,' अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमाचे कौतुक केले होते.

ॲड. दीपक पटवर्धन यांचा परीसस्पर्श लाभलेली रत्नागिरीतील आणखी एक संस्था म्हणजे रत्नागिरी जिल्हा नगर वाचनालय. १८२२ साली स्थापन झालेले राज्यातील हे सर्वांत जुने वाचनालय पटवर्धन सरांच्या नेतृत्वाखाली पुन्हा भरभराटीला आले आहे. त्याचा शब्दशः कायापालट झाला आहे. वेगवेगळ्या साहित्यिक-सांस्कृतिक कार्यक्रमांपासून वाचन चळवळ वाढवण्यासाठीचे वेगवेगळे उपक्रम या वाचनालयात सातत्याने राबवले जात आहेत. सरांची उपक्रमशीलता, कल्पकता यांमुळे हे शक्य होते. काळाची गरज वेळीच ओळखून पतसंस्थेत सेंट्रल बँकिंग सिस्टीम, पिग्मी मशीन, तर वाचनालयाचे ॲप अशा नवतंत्रज्ञानाच्या गोष्टींची अंमलबजावणी पटवर्धन सरांनी केली. या दोन्ही संस्थांच्या नव्या इमारती आता होत आहेत. प्रत्येक संस्थेचा कार्यभार व्यवस्थित चालण्यासाठी आवश्यकता असते, की प्रामाणिक आणि गुणवान मनुष्यबळाची. अशी मंडळी हेरून त्यांना नेमण्यासाठी सरांची गुणग्राहकता उपयोगी पडते. वकिलीच्या शिक्षणाचा आणि सातत्यपूर्ण अभ्यासाचा उपयोग तर त्यांना सर्वच कार्यक्षेत्रांत होत आहे. राजकीय कार्यक्षेत्रातही त्यांनी एक वेगळा ठसा उमटवला. अर्थात, आई आणि पत्नीसह त्यांच्या सर्व कुटुंबाची साथही यात खूप महत्त्वाची आहे.

पटवर्धन सरांविषयी सांगण्यासारख्या गोष्टी बऱ्याच आहेत. त्यांच्याविषयी बऱ्याच वर्षांपासून ऐकले असले, तरी माझी त्यांची जवळची ओळख गेल्या वर्षभरातली. 'स्वरूप सहकार'च्या निमित्ताने त्यांच्यासोबत काम करण्याचा अनुभव घेतोय, तेव्हा दर भेटीत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे नवे पैलू कळत आहेत. 'सहकार स्वरूपा' या त्यांच्या पुस्तकाचे प्रकाशन अलीकडेच झाले. त्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभातही त्यांच्याविषयी अनेक गोष्टी कळल्या आणि ते पुस्तक पूर्ण वाचल्यावर तर त्यांच्याविषयीचा आदर अधिकच वाढला आहे. त्या कार्यक्रमात त्यांनी सांगितलेला एक प्रसंग त्यांच्या जडणघडणीबद्दल बरेच काही सांगून जातो. ते म्हणाले होते, 'शिक्षिका असलेली माझी आई लहानपणी माझ्याकडून दररोज संध्याकाळी शुभंकरोती आणि श्लोक म्हणवून घ्यायची. मी तिला नेहमी ध्रुवबाळाची गोष्ट सांगायला सांगायचो. कदाचित त्या ध्रुवबाळाच्या गोष्टीचा माझ्या मनावर असा परिणाम झाला, की ज्या ज्या संस्थांमध्ये मी काम सुरू केले, तिथे प्रदीर्घ काळ सातत्याने यशस्वीपणे काम करू शकलो. हा माझ्यावर झालेला संस्कार आहे.'

ज्या हाउसिंग फायनान्स कॉर्पोरेशनमध्ये त्यांनी केवळ ७०० रुपयांवर काम केले, त्याच संस्थेचा १० वर्षे संचालक म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली. कोकणामध्ये सहकार क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन अनेकदा नकारात्मक असतो. अशा परिस्थितीत केवळ १० हजार रुपये घेऊन सुरू केलेली पतसंस्था आज त्यांनी ७०० कोटी रुपयांपर्यंत नेली. ३०० सभासदांच्या एका छोट्या गटापासून सुरू झालेला पतसंस्थेचा

प्रवास ४९ हजार सभासदांपर्यंत पोहोचला आहे. रत्नागिरी तालुक्यापुरते मर्यादित असलेले स्वरूपानंद पतसंस्थेचे कार्यक्षेत्र आज संपूर्ण महाराष्ट्रभर पसरले आहे. एका सर्वसामान्य, मध्यमवर्गीय घरातील मुलगा उत्तम संस्कार आणि आपल्या प्रामाणिक कष्टांच्या जोरावर, तत्त्वांशी तडजोड न करता सकारात्मकतेने कशी प्रगती करू शकतो, हे पटवर्धन सरांकडे पाहिल्यावर कळते. त्यांचा हा प्रेरणादायी प्रवास ज्यांना जाणून घ्यायचा आहे, त्यांनी 'सहकार स्वरूपा' हे पुस्तक आवर्जून वाचायलाच हवे.

रत्ननगरी म्हणजे अनेक नररत्नांची खाण आहे. त्या खाणीत जन्मलेले ॲड. दीपक पटवर्धन म्हणजे गुणांची खाण असलेले व्यक्तिमत्त्व आहे. ते ज्या ज्या क्षेत्रात गेले, त्या प्रत्येक ठिकाणी त्यांनी आपल्या या गुणांमुळे अतुलनीय, आदर्श कार्य केले. षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील असंख्य गुणांपैकी मला भावलेल्या निवडक ६० गुणांची यादी करण्याचा प्रयत्न केला आहे. ते असे -

१. ज्ञानसंपन्नता, २. चारित्र्यसंपन्नता, ३. प्रतिभासंपन्नता, ४. प्रामाणिकपणा, ५. पारदर्शकता, ६. विश्वासार्हता, ७. अभ्यासूपणा, ८. कल्पकता, ९. सर्वसमावेशकता, १०. योजकता, ११. व्यावसायिकता, १२. दांडगा जनसंपर्क, १३. संघटनकौशल्य, १४. नेमकेपणा, १५. नेटकेपणा, १६. सातत्यपूर्णता, १७. ध्यासमग्नता, १८. अष्टावधान, १९. शिस्तशीरपणा, २०. काटेकोरपणा, २१. सचोटी, २२. महत्त्वाकांक्षा, २३. न्यायप्रियता, २४. संवेदनशीलता, २५. प्रयत्नशीलता, २६. उपक्रमशीलता, २७. नावीन्यपूर्णता, २८. सक्षम नेतृत्व, २९. प्रभावी वक्तृत्व, ३०. कर्तव्यकठोरता, ३१. समयोचित निर्णयक्षमता, ३२. दूरदर्शित्व, ३३. विवेकीपणा, ३४. तर्कशुद्धता, ३५. व्यावहारिकता, ३६. वैचारिकता, ३७. सकारात्मकता, ३८. परिपक्वता, ३९. प्रगल्भता, ४०. संतुलितता, ४१. निर्व्यसनीपणा, ४२. समयसूचकता, ४३. धैर्यशीलता, ४४. आत्मविश्वास, ४५. नियोजनबद्धता, ४६. गुणग्राहकता, ४७. ध्येयसाधना, ४८. अचूकता, ४९. सत्यप्रियता, ५०. धडाडी, ५१. संयतता, ५२. सत्शीलता, ५३. समस्यानिवारण कौशल्य, ५४. समाजहितैषी वृत्ती, ५५. सहकारतज्ज्ञता, ५६. विधिज्ञता, ५७. अक्षरसेवा, ५८. सश्रद्धता, ५९. मातृ-पितृभक्ती, ६०. स्वामीभक्ती-गुरूभक्ती. (या गुणांची प्रभावळ असलेले त्यांचे चित्र या अंकाच्या पान क्रमांक दोनवर पाहता येईल.)

तत्त्वनिष्ठ, प्रेरक वाटचाल करून षष्ट्यब्दीपूर्तीचा समृद्ध प्रवास करणारे ॲड. दीपक पटवर्धन यांच्या आणि स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या यशाचे गमक या गुणवैभवामध्येच दडलेले आहे...! त्यांनी आधीच मोठी उंची गाठलेलीच आहे. त्यांचा यापुढचा प्रवासही असाच अधिकाधिक उत्तुंगतेकडे वाटचाल करणारा आणि सर्वांसाठी दीपस्तंभाप्रमाणे ठरणारा व्हावा, यासाठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा!

**- अनिकेत कोनकर**

## स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या शाखा

### रत्नागिरी जिल्हा

**रत्नागिरी :** दुसरा मजला, रत्नागिरी मध्यवर्ती एसटी स्टँडसमोर, प्रेसिडन्सी बिझनेस हाउस, रत्नागिरी - ४१५६१२, फोन : (०२३५२) २२१२६३, ९४०३५०६३६३

**मारुती मंदिर :** जोगळेकर संकुल, नाचणे रोड, मारुती मंदिर, रत्नागिरी फोन : (०२३५२) २२३५७७, २९५६३५, ९४२०२९३५७४

**कोकणनगर :** २५, इंदू निवास, कोकणनगर स्टॉप, मजगाव रोड, नूर क्लिनिकशेजारी, रत्नागिरी, फोन : ९४२२५६३६०९

**कुवारबाव :** गाळा नं. ४, वसुंधरा कॉम्प्लेक्स, कुवारबाव, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५६१७, ९४२१५४१९११

**पावस :** रबिया कॉम्प्लेक्स, पावस बाजारपेठ, पावस, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २३७००३, २९५८६३, ९४२०४८७०९४

**जाकादेवी :** प्रमिला कॉम्प्लेक्स, तळमजला, जाकादेवी बाजारपेठ, जाकादेवी, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २५१४१८, २९५६६३, ९४०५५७६८२९

**खंडाळा :** अनंत कॉम्प्लेक्स, पहिला मजला, धारकर मेडिकलशेजारी, खंडाळा, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २४३२६३, ९४०५०२५००९

**मालगुंड :** लक्ष्मी भवन, नॉव्हेल्टी स्टोअरसमोर, मालगुंड बाजारपेठ, मालगुंड, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २३५२०२, ९४०५०३७३०८

**पाली :** दळी शॉपिंग सेंटर, पाली बाजारपेठ, पाली, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५८५३, ८२७५६७५४४०

**लांजा :** सद्गुरू कृपा, हॉटेल प्रसन्नशेजारी, आठवडा बाजार, लांजा, ता. लांजा, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५१) २९९०६०, ७५८८३००५८३

**राजापूर :** जी-२, दत्तसाई अपार्टमेंट, साई मंदिराजवळ, चव्हाणवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २३२०६३, ९४२२९६३०९३

**नाटे :** श्री. अमोल देवरूखकर यांचे घर, सडापेठ नाटे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २९५८६३, ९४०३०४६५३८

**साखरपा :** जुगाई कृपा, जुना बस स्टँड, साखरपा बाजारपेठ, साखरपा, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २९९१४७, ७५८८६६८११४

**देवरूख :** द्वारा श्री. श्रीरंग शिर्के, आपला बाजारच्या शेजारी, शिवाजी चौक, देवरूख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २६०२६३, ९४२११३८८३०

**चिपळूण :** लक्ष्मी गॅलॅक्सी, साउंड ऑफ म्युझिकसमोर, शिवाजी चौक, चिंचनाका, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५५) २५२७२८, ७५८८९३३८१०

### सिंधुदुर्ग जिल्हा

**देवगड-जामसंडे :** स्वरूप बिल्डिंग, जामसंडे बस स्टॉपजवळ, जामसंडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग - ४१६६१२, फोन : (०२३६४) २६१२६३, ७५८८९५८७९८

### पुणे जिल्हा


**कोथरूड :** शॉप नं. ३, मेघरंजनी अपार्टमेंट, लेन नं. ६, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८, फोन : (०२०) २५३८५४७०, ९४०४५४८१३८

# निष्ठा, कर्तव्यकठोरता, उपक्रमशीलतेचा प्रवास

**अ‍ॅड. दीपक पटवर्धन यांच्या साठाव्या वाढदिवसानिमित्ताने त्यांच्या विविध क्षेत्रांतील प्रवासाचे सिंहावलोकन करणारा हा लेख...**



लोकप्रिय ठरलेल्या अत्यंत यशस्वी असलेल्या संस्थांची उभारणी करणारे व्यक्तिमत्त्व अशी ज्यांची प्रभावी ओळख आहे ते म्हणजे अ‍ॅड. दीपक पटवर्धन. सहकार क्षेत्रातील जाणकार आणि रचनात्मक काम उभे करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची किमया अ‍ॅड. पटवर्धन यांनी साध्य केली. रत्नागिरी जिल्हा नगर वाचनालयाचा कायापालट केला. रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत आपल्या कार्यकर्तृत्वाने ठसा उमटवला. कै. गोविंदराव निकम आणि विद्यमान अध्यक्ष डॉ. तानाजीराव चोरगे यांचा विश्वासू सहकारी म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली. वयाच्या अवघ्या पस्तिशीत असताना मध्यवर्ती बँकेच्या कठीण राजकारणात दिग्गजांना पराभूत करत प्रवेश केला तिथपासून आता वयाच्या साठाव्या वर्षापर्यंत सातत्याने चार निवडणुकांमध्ये विजय मिळवून आणि त्यातही चौथ्यांदा निवडून येताना जिल्हा मतदारसंघातून बिनविरोध विजय होण्याची किमया आपल्या अभ्यासू वर्तनाच्या जोरावर त्यांनी साध्य केली. भाजप विचारधारेच्या व्यक्तीने केलेला मध्यवर्ती बँकेतील हा दीर्घ प्रवास अ‍ॅड. पटवर्धन यांच्या कर्तृत्वाची साक्ष देणारा आहे. मध्यवर्ती बँकेचा आधारस्तंभ म्हणून अ‍ॅड. पटवर्धन यांचे नाव हे पहिल्या काही नावांमध्ये समाविष्ट आहे. सहकार क्षेत्रातील जिल्ह्यातील शिखर बँकेवर प्रदीर्घ काळ संचालकपद भूषवणे ही भाजप वर्तुळात खरे तर अपवादाने आढळणारी गोष्ट. भारतीय जनता पक्ष सत्तेत नव्हता, तेव्हापासून प्रारंभी सहकार पॅनेलच्या विरोधात जाऊन जिंकण्याची किमया अ‍ॅड. पटवर्धन यांनी केली, हे कोणीच अमान्य करणार नाही. केवळ शिखर बँकेवर संचालक म्हणून काम करून ते थांबले नाहीत, तर राज्य स्तरावरचे सर्वांत जुने महामंडळ म्हणजे महाराष्ट्र हाउसिंग फायनान्स कॉर्पोरेशन या महामंडळावरही अ‍ॅड. पटवर्धन यांनी १० वर्षे संचालक म्हणून काम केले, ही गोष्ट नव्या पिढीला माहीतही नसेल.




ज्या महामंडळात केवळ सातशे रुपये पगारावर नोकरी केली, त्याच महामंडळाची नोकरी सोडून वकिली व्यवसायाची सुरुवात केली आणि महामंडळाची निवडणूक लढवून भरघोस मताधिक्याने विजय संपादन करून फायनान्स कॉर्पोरेशनवर सलग १० वर्षे अ‍ॅड. पटवर्धन यांनी प्रभावी काम केले. राज्य स्तरावर संचालक म्हणून काम केल्यामुळे राजकारणातील अनेक दिग्गज - अंकुशराव काकडे, मदन पाटील, टोपे, शिवाजीराव शिंदे, तत्कालीन अनेक दिग्गज मंत्री यांच्यासह काम करण्याची संधी अ‍ॅड. पटवर्धन यांना प्राप्त झाली. राज्य स्तरावर काम करणाऱ्या पतसंस्था फेडरेशन या राज्यस्तरीय संस्थेवर गेली २० वर्षे संचालक म्हणून अ‍ॅड. पटवर्धन काम पाहत आहेत. सद्यस्थितीत राज्य पतसंस्था फेडरेशनचे कार्याध्यक्ष म्हणून ते काम पाहत आहेत.

सहकार या विषयावर अनेक जिल्ह्यांमध्ये व्याख्याते म्हणून अ‍ॅड. पटवर्धन यांनी खूप व्याख्याने दिली असून, सहकार कायदा आणि व्यवस्थापन या विषयांवरील त्यांची अनेक भाषणे लोकप्रिय ठरली आहेत. अशा पद्धतीने सहकार क्षेत्रात राज्य स्तरापर्यंत मजल मारण्याचे आणि राज्य स्तरावर प्रभाव निर्माण करण्याइतपत यशही आपल्या सहकार क्षेत्रातील प्रवासात अ‍ॅड. पटवर्धन यांनी प्राप्त केले आहे.

सहकार क्षेत्राप्रमाणेच त्यांनी राजकीय क्षेत्रातही १९८० ते २०२६पर्यंत भाजपचे काम विविध पदांवर पूर्ण निष्ठेने आणि कमालीची स्वच्छ प्रतिमा राखत केले आहे. लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्था, विधान परिषद इत्यादी निवडणुकांमध्ये पक्षाने दिलेली जबाबदारी घेऊन पूर्णांशाने न्याय देत आपला राजकीय प्रवास पूर्ण निष्ठेने केला आहे. कै. तात्यासाहेब नातू, पदवीधर मतदारसंघाचे पहिले आमदार वसंतराव पटवर्धन, कै. शिवाजीराव गोताड, कै. अशोकराव मोडक यांच्या निवडणुकांपासून विविध जबाबदाऱ्या घेऊन भाजपाच्या जिल्हाध्यक्षपदापर्यंत त्यांनी मजल मारली. रत्नागिरीतील भाजपच्या दिग्गजांच्या राजकारणात जिल्हाध्यक्षपदापर्यंत पोहोचणे यात त्यांचे राजकीय कर्तृत्व स्पष्ट होते. कै. प्रमोद महाजन, धरमचंद चोरडिया, प्रकाश जावडेकर, किरीट सोमय्या या जुन्या काळातील भाजपच्या नेतृत्वाबरोबर काम करण्याचे भाग्य त्यांना लाभले, याचा अभिमान त्यांनी अनेकदा व्यक्त केला आहे. भाजपचा पोस्टर चिकटवणारा कार्यकर्ता ते प्रदेश कार्यकारिणी सदस्य ते भाजप जिल्हाध्यक्ष असा त्यांचा प्रवास खूप लक्षणीय ठरतो.

याच दरम्यान २०२२ ते २०२६ अशी चार वर्षे गोवा शिपयार्ड या मोठ्या शिपयार्डमध्ये स्वतंत्र संचालक म्हणून केंद्र शासनाच्या कॅबिनेट कमिटीने त्यांची दोन वेळा नियुक्ती केली. गोवा शिपयार्डमध्ये चार वर्षे ऑडिट समिती अध्यक्ष म्हणून यशस्वी काम करून आपल्या कर्तृत्वाची चुणूक त्यांनी दाखवली. गोवा शिपयार्डचा प्रकल्प रत्नागिरीमध्ये आणण्याच्या कामातही स्वतंत्र संचालक म्हणून त्यांचे योगदान आहे.

विविध संस्थात्मक कार्यात महत्त्वाची जबाबदारी पार पाडत असताना आपल्या वकिली व्यवसायाकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. २००० ते २०१९ या कालावधीत प्रामुख्याने सहकार क्षेत्रात त्यांनी वकील म्हणून प्रभावी काम केले. सुमारे तीन हजार केसेसमध्ये त्यांनी वकील म्हणून यशस्वी काम केले. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील अनेक संस्थांची वकिली त्यांनी यशस्वीपणे केली. त्यांच्या १८ वर्षांच्या व्यावसायिक कामकाजात



एकाही संस्थेची केस फेल गेली नाही. संस्थेला यश देण्यात ते यशस्वी ठरले. एकंदरीतच वकिली व्यवसायामधील त्यांची कामगिरी प्रभावी अशीच आहे.

त्यांनी रत्नागिरी जिल्ह्यामध्ये पतसंस्था फेडरेशनची स्थापना केली. हाउसिंग फेडरेशनचे अध्यक्ष म्हणून ते आजही कार्यरत आहेत. अनेक गृहतारण संस्थांची स्थापना त्यांनी केली. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेमधील त्यांचे प्रदीर्घ काम. स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेला शून्यातून आजच्या अग्रस्थानी पोहोचवणारा किमयागार म्हणून ॲड. पटवर्धन यांच्याकडे पाहिले जाते. प्रारंभ संस्थेचा हरकाम्या म्हणावे असे काम करून लोकांना विश्वास आणि पारदर्शकतेचे दाखले देत स्वरूपानंद पतसंस्थेचे विशाल अर्थविश्व त्यांनी उभारले. २०१२मध्ये शासनाचा सहकारभूषण पुरस्कार प्राप्त झाला. त्यांच्या नेतृत्वाखाली तालुका कार्यक्षेत्रापासून महाराष्ट्र कार्यक्षेत्रापर्यंत संस्थेचा विस्तार झाला. २०००पासून २६ वर्षे स्वरूपानंद पतसंस्थेचे अध्यक्ष म्हणून संस्थेला अग्रस्थानी ठेवत ॲड. पटवर्धन यांनी विश्वासार्ह पतसंस्था म्हणून पतसंस्थेची ओळख पूर्ण महाराष्ट्रभर पसरवली. ॲड. पटवर्धन यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत स्वच्छ, विश्वासार्ह आणि नेमस्त आहे. वकिली क्षेत्रातील अभ्यास आणि सहकार चळवळीत काम करण्याची आवड यांच्या संगमातून स्वरूपानंद पतसंस्था साकारत गेली, याचे संपूर्ण श्रेय ॲड. पटवर्धन यांचे आहे. कमालीची कर्तव्यकठोरता, आचार-विचारातील स्पष्टता आणि प्रदीर्घ अनुभवातून आलेली आर्थिक प्रगल्भता, अचूक निर्णयक्षमता आणि उपक्रमशीलता आणि कामाबाबत असलेली कमालीची निष्ठा, अथक परिश्रम करण्याची वृत्ती यामुळे ॲड. पटवर्धन यांना हे यश मिळाले. स्वरूपानंद पतसंस्थेसाठी अहोरात्री परिश्रम करताना त्यांनी कधीच मागेपुढे पाहिले नाही. समर्पित भावनेने केलेले काम असेच त्यांच्या या कामाचे वर्णन करता येईल. आपल्या वर्तनातून त्यांनी विश्वासार्हतेचा मानदंड निश्चित केला म्हणूनच हा आर्थिक प्रवास प्रचंड विस्तारताना आपण पाहत आहोत.

स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेबरोबरच गेली ३१ वर्षे रत्नागिरी जिल्हा नगर वाचनालय या संस्थेचा कायापालट ॲड. पटवर्धन यांनी केला. सर्वांत जुने, पण सर्वांत अद्ययावत वाचनालय उत्तम आर्थिक पायावर उभे राहावे, म्हणून ॲड. पटवर्धन यांनी मिशन म्हणून काम केले. केवळ १० महिन्यांत उत्तम दिमाखदार इमारत उभी केली. त्यापूर्वी १४ वर्षे अथक संघर्ष करून शासनाकडून वाचनालयाची जागा प्रदीर्घ



कालावधीसाठी लीज ॲग्रीमेंट करून प्राप्त केली आणि पुढची १०० वर्षे टिकेल अशी दिमाखदार इमारत ॲड. पटवर्धन यांनी अथक प्रयत्नान्ती उभी केली. रत्नागिरीचे हे सांस्कृतिक वैभव टिकवण्यासाठी, नव्या युगामध्ये दिमाखात उभे राहण्यासाठी ॲड. पटवर्धन यांचे योगदान हे वाचनालय आणि रत्नागिरीची सुसंस्कृत जनता कधीच विसरणार नाही.




अशा कर्तव्ययोद्ध्याच्या साठाव्या वाढदिवसानिमित्ताने त्यांच्या कार्यकर्तृत्वाकडे पाहिल्यावर लक्षात येते ती त्यांची कर्तव्यनिष्ठा, कठोर परिश्रम, ध्येयनिष्ठा आणि कमालीचे स्वच्छ चारित्र्य! या सर्व गुणांचा समुच्चय असलेल्या या छोट्या मूर्तीला वाढदिवसानिमित्त आभाळभर शुभेच्छा!

**– विशेष प्रतिनिधी**

# स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या प्रगतीचे मानबिंदू

सर्व नियमांचे पालन करून अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने, पारदर्शकपणे आर्थिक व्यवहार करणारी पतसंस्था अशी स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेची ओळख आहे. या पद्धतीने ग्राहकांना उत्तम सेवा देऊन, अत्यंत प्रामाणिकपणे वाटचाल करून पतसंस्थेने यशप्राप्ती केली आहे. पतसंस्थेच्या 17 शाखांपैकी आठ शाखा स्वमालकीच्या जागेत आहेत. शिवाय, रत्नागिरी बाजारपेठेत प्रधान कार्यालयाची नवी इमारतही झपाट्याने आकार घेत आहे. पतसंस्थेच्या प्रगतीचे मानबिंदू असलेल्या या कार्यालयांची ही चित्रमय झलक...




प्रधान कार्यालय, रत्नागिरी



रत्नागिरीत साकारत असलेली प्रधान कार्यालयाची नवी इमारत




मारुती मंदिर शाखा, रत्नागिरी




जाकादेवी शाखा



कुवारबाव शाखा




खंडाळा शाखा




पावस शाखा




चिपळूण शाखा




राजापूर शाखा

# 500 कोटी ठेवींचे

## स्वप्न नव्हे... हा संकल्प आहे!

हिशेबात
**“स्पष्टता”**
३५ वर्षांची कटिबध्दता!

### ३० एप्रिल २०२६ अखेर आर्थिक आढावा

| | |
|---|---|
| ठेवी : | ४११ कोटी ९ लाख |
| कर्ज : | ३०५ कोटी ३६ लाख |
| वसुलीचे प्रमाण : | ९९.७७ % |
| निव्वळ नफा : | १० कोटी ९४ लाख (३१ मार्च २०२६) |
| स्वनिधी : | ५४ कोटी ६४ लाख |
| गुंतवणूक : | १६८ कोटी ८९ लाख |
| सीडी रेशो : | ६७.६४ % |



सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक यांना मन:पूर्वक धन्यवाद!

– ॲड. दीपक पटवर्धन (अध्यक्ष)

# स्वामी स्वरूपानंद सह.पतसंस्था

मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य

प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २ रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी.

मो. नं. 9403 506 363

www.swaroopanandpatsanstha.com